# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.07.2026** **वार:सोमवार**

---

1. परीक्षा कार्यपद्धती अधिक पारदर्शी करण्यासाठी उच्च-स्तरीय कार्यगट स्थापन करण्याची पंतप्रधानांची घोषणा
2. लोकसभेत आज सार्वजनिक परीक्षा- गैरप्रकार प्रतिबंध-सुधारणा विधेयक, 2026 सादर करण्यात येणार
3. पाकिस्तानशी केवळ 'पाकव्याप्त काश्मीर' मुद्यावरच चर्चा होणार-संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची स्पष्टोक्ती
4. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारत्तोलन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची चमकदार कामगिरी आणि
5. झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-20 क्रिकेट मालिकेत भारताला निर्भेळ यश

**परीक्षा सुधारणा-टास्क फोर्स**

परीक्षा सुधारणांबाबत एका उच्च-स्तरीय कार्यगटाची स्थापना करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केली. प्रसिद्ध तंत्रज्ञान तज्ज्ञ नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखालील या कार्यगटात भारतीय गुप्तचर संस्था अर्थात आय बी चे माजी संचालक तपन डेका, इस्रोचे माजी अध्यक्ष एस. सोमनाथ आणि आयआयटी चेन्नईचे संचालक व्ही. कामकोटी यांचाही समावेश असेल. याव्यतिरिक्त, शिक्षण विभागाच्या माजी सचिव अनिता करवाल आणि पुरवठासाखळी तज्ज्ञ अमृत लाल मीणा हे देखील या कार्यगटाचा भाग असतील. पंतप्रधानांनी काल एका दृक-श्राव्य संदेशांतून ही माहिती दिली. हा कार्यगट परीक्षांमधील सुधारणांवर लक्ष केंद्रित करेल आणि त्याच्या अहवालाच्या आधारे, आगामी परीक्षांची विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी लवकरात लवकर पावलं उचलली जातील. देशाची परीक्षा प्रणाली विश्वासार्ह आणि पारदर्शक असावी आणि त्यात तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर केला जावा, असं सांगत, स्पर्धा परीक्षांची सचोटी जपण्यासाठी आणि लाखो विद्यार्थ्यांचं भविष्य सुरक्षित करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचंही पंतप्रधानांनी नमूद केलं.

ते म्हणाले....

**हमारी परीक्षा पद्धति विश्वस्त हो, हमारी परीक्षा पद्धति ट्रांसपेरेंट हो। हमारी परीक्षा पद्धति में सबसे ज्यादा टेक्नोलॉजी का उपयोग हो। इन सारी बातों को ध्यान में रखते हुए विश्व प्रसिद्ध टेक्नोलॉजी एक्सपर्ट श्रीमान नंदन निलेकनी जी के नेतृत्व में एक हाई पावर टास्क फोर्स बनाने का निर्णय किया है जो एक्जामिनेशन रिफॉर्म की तरफ फोकस करेगा और जल्द से जल्द आने वाली परीक्षाओं की विश्वसनीयता को सुनिश्चित करने का काम इसके रिपोर्ट के आधार पर कर दिया जाएगा।**

**परीक्षा-विधेयक**

लोकसभेत आज केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह, सार्वजनिक परीक्षा- गैरप्रकार प्रतिबंध-सुधारणा विधेयक, 2026 सादर करण्यात येणार आहे. या विधेयकांत, पेपरफूटी तसंच, परीक्षेतील गैरप्रकारांच्या प्रकरणांसंदर्भात, समर्पित न्यायिक यंत्रणा स्थापित करण्यासाठी आणि गुन्हेगारी खटल्यांना गती देण्यासाठी तसंच दोषीना अधिक कठोर शिक्षा करण्यासह सात महत्त्वाच्या सुधारणा प्रस्तावित आहेत. दरम्यान, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी, आज सादर होणाऱ्या परीक्षा सुधारणा विधेयकावरील चर्चेत सहभागी होण्याचं आवाहन सर्व खासदारांना समाजमाध्यमांवरील संदेशांतून केलं आहे.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल 'मन की बात' कार्यक्रमाच्या 136 व्या भागातून देशवासीयांशी संवाद साधला. कारगील विजय दिनानिमित्त त्यांनी शहिदांना अभिवादन केलं. स्वदेशी आयएनएस महेंद्रगिरी, पिनाका आणि कुश या क्षेपणास्त्रांच्या यशस्वी चाचण्यांचा उल्लेख करत आत्मनिर्भर भारताचं संरक्षण सामर्थ्य त्यांनी अधोरेखित केलं. पुढच्या महिन्यात साजऱ्या होणाऱ्या स्वातंत्र्य दिनी 'हर घर तिरंगा' अभियानात उत्साहानं सहभागी होण्याचं आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केलं. भारतीय खेळाडू तसंच शैक्षणिक ऑलिम्पियाडमधील विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा मोदी यांनी यावेळी गौरव केला. येत्या सण उत्सवांच्या काळात खादीची उत्पादनं खरेदी करण्याचं आवाहन मोदी यांनी यावेळी केलं.

**प्रह्लाद जोशी-पदभार**

केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी काल कर्तव्य भवन येथे शिक्षण मंत्रालयाचा पदभार स्विकारला. पदभार स्वीकारल्यानंतर, जोशी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण मंत्रालयाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत त्यांनी विविध योजना आणि उपक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांच्यासह वरिष्ठ पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

**करगिल दिवस**

पाकिस्तानशी यापुढे केवळ पाकव्याप्त जम्मू-काश्मीरवर चर्चा होईल असं केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काल स्पष्ट केलं. लडाखमधील द्रास येथे 27 व्या कारगिल विजय दिवस सोहळ्याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. भारताच्या सार्वभौमत्वाच्या विरोधात केलेल्या प्रत्येक आगळीकीला, भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून प्रत्युत्तर दिलं आहे आणि यपुढेही दिलं जाईल असं सिंह यांनी नमूद केलं. काल देशभरात करगिल दिवस साजरा करण्यात आला. 1999ला पाकिस्तान विरुद्ध झालेल्या संघर्षात पाकिस्तानवर भारताने मिळवलेल्या विजयाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात येतो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी या युद्धातील शहिदांना श्रद्धांजली वाहिली.

**अमेरिका-इराण**

अमेरिका आणि इराणनं काल सलग दुसऱ्या दिवशी परस्परांच्या ठिकाणांवरील हल्ले थांबवल्यानं पुन्हा तात्पुरती युद्धबंदी लागू करण्याबाबत नव्यानं वाटाघाटी सुरू होण्याची शक्यता बळावली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात जवळपास गेल्या दोन आठवड्यांपासून लष्करी तणाव निर्माण झाला होता. अमेरिकेचे संयुक्त राष्ट्रांमधील राजदूत माइक वॉल्ट्झ यांनी ओमान, इराण सह अन्य संबंधितांशी सर्व स्तरांवर चर्चा सुरू असल्याचं नमूद करत अध्यक्ष ट्रम्प त्यांना मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून यावर मार्ग काढण्याची संधी देत असल्याचं म्हटलं आहे. इराणचे हल्ले रोखण्यासाठी आवश्यक क्षेपणास्त्रांचा अमेरिकेकडील साठा संपत असल्याची व्यक्त करण्यात येत असलेली शक्यता वॉल्ट्झ यांनी फेटाळली.

**फ्रान्स-वणवा**

फ्रान्स आणि स्पेंन लगतच्या जंगलांत लागलेल्या प्रचंड वणव्यामुळे दोन्ही देशांमधील सुमारे तीन लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. फ्रान्स मधील बोर्डो या ऐतिहासिक शहराला या आगीचा सर्वाधिक फटका बसला असून, हा वणवा शहराच्या 15 किलोमीटरच्या परिघात पसरला आहे. या आगीमुळे अटलांटिक किनाऱ्यावरील कॅप फेरेट द्वीपकल्प उद्ध्वस्त झाला आहे. अग्निशमन आणि इतर बचाव दलं आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहेत.

**अब्दुल कलाम पुण्यतिथी**

माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची आज पुण्यतिथी आहे. लोकसभेचे सभापति ओम बिर्ला यांनी कलाम यांना आदरांजली वाहिली आहे. स्वदेशी क्षेपणास्त्रं आणि देशाच्या अंतराळ संशोधन कार्यक्रमांना नव्या उंचीवर नेण्यातलं डॉ. कलाम यांचं योगदान भारतीय विज्ञानाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांमध्ये कोरलं गेलं आहे, असं बिर्ला यांनी समाजमाध्यमांवरील संदेशांत म्हंटलं आहे.

**राष्ट्रकुल स्पर्धा-मीराबाई चानू**

ग्लासगोमध्ये मध्ये सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताची भारोत्तोलन प्रमुख मीराबाई चानू हिनं सुवर्णपदक जिंकत, या स्पर्धेतील भारताच्या सुवर्णपदकाचं खातं उघडलं. मिराबाईने 48 किलो वजनी गटात एकंदर 190 किलो वजन उचलत ही कामगिरी केली. तिने, स्नॅच प्रकारात 85 किलो आणि क्लीन अँड जर्क प्रकारात 105 किलो वजन उचलून राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत नवीन विक्रम देखील प्रस्थापित केला. राष्ट्रकुल स्पर्धांमधील चानू हीचं हे सलग तिसरं सुवर्णपदक आहे. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मीराबाई चानूच्या या सुवर्णकामगिरीबद्दल तिचं अभिनंदन केलं आहे.

भारोत्तोलनात भारताच्या खात्यात काल आणखी दोन रौप्य पदकांची भर पडली. पुरुष गटात चनांबम हृषिकांत सिंग यानं 60 किलो वजनी गटात एकंदर 264 किलो वजन उचलून रौप्य पदक मिळवलं तर राजा मुथुपंडी यानं 65 किलो गटात एकंदर 286 किलो वजन उचलून आणखी एक रौप्य पदक मिळवून दिलं. मुष्टीयुद्धातही भारताची आगेकूच सुरू आहे. पुरुषांमध्ये जादुमणी सिंग यानं तर महिला मुष्टियोद्ध्यांमपैकी प्रीती पवार हिनं आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत काल उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला. पदक तालिकेत भारताच्या खात्यातील एकंदर पदकांची संख्या आता चार झाली आहे.

**क्रिकेट**

झिम्बाब्वे मधील हरारे इथे काल झालेल्या टी-20 क्रिकेट मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात, भारताने झिम्बाब्वे संघाचा 35 धावांनी पराभव केला आणि मालिका 3-0 अशी जिंकली. प्रथम फलंदाजी करताना भारताने निर्धारित 20 षटकांत 192 धावा केल्या. यात, वैभव सूर्यवंशीच्या 49 चेंडूतील 81 धावांचा समावेश आहे. प्रत्युत्तरादाखल झिम्बाब्वे केवळ 157 धावाच करू शकला. वैभव सूर्यवंशीला सामनावीर आणि मालिकावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

**हवामान**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे आज ओडिशामध्ये सर्वदूर अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. छत्तीसगड, पश्चिम बंगाल, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि उत्तराखंडमध्येही काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. महाराष्ट्रात रायगड, रत्नागिरी, तसंच पुणे आणि सातारा घाट परिसरात आज मुसळधार पाऊस पडेल अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. इशान्येकडील राज्यांमध्येही आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**